## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-१४०/२०२१

**अपिलार्थी, श्री. भिष्म भट्ट**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा**
अतिरीक्त कार्यकारी अभियंता, सं व सु विभाग अलिबाग,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मु.पंतनगर, कर्णिक
हॉल जवळ, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१

**जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,**
अलिबाग उपविभाग -२,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
अलिबाग उपविभाग -२, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १८.५.२०२२**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १२.१०.२०२० | १९.१०.२०२० | २७.११.२०२० | ---- |

अपीलार्थी यांनी आयोगाकडे दि.१८.१.२०२१ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १८.५.२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, अलिबाग उपविभाग-२ आणि तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलिय प्राधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले की, त्यांच्या दिनांक १२.१०.२०२० रोजीच्या माहिती अर्जान्वये, "*Meter Installation and Work Details Report copies on my land.*" अशा प्रकारची माहिती मागीतली होती. सदर माहिती त्यांना मिळालेली नाही. यास्तव द्वितीय अपिल दाखल केले आहे.

तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी तथ उप कार्यकारी अभियंता, अलिबाग उपविभाग-२ यांनी सुनावणीच्या वेळी असे सादर केले की, आजरोजी आयोगासमोर अपिलार्थीस माहिती पुरविण्यात येत आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, सकृतदर्शनी जन माहिती अधिकारी यांनी आजरोजी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती दिलेली आहे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती देण्यात आल्यामुळे, अपील निकाली काढण्यात येत आहे.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १८ मे, २०२२

(सुनील पोरवाल)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

संगणक-१०